पारावरच्या गप्पा

# कशी आणि कधी येईल दुधाच्या व्यवसायाला बरकत?



**नि**त्यनियमाप्रमाणे देवदर्शन आटोपून गणपत पारावर बसला होता. संपतनेही दर्शन घेतले व गणपतजवळ बसत तो म्हणाला, ''काय गंपा, आटोपली का कामं दररोजची?''

यावर हसत गणपत म्हणाला, ''आरं, आपल्या शेतकऱ्यांची कामं कधी आटोपतात काय? दिवस उजाडला की झाली कामांची सुरुवात. दिवस मावळेपर्यंत कामांची यादी आणि कामं संपत नाहीत बघ! म्हणून जास्त लोड नाही घ्यायचा. जेवढं होईल तेवढं करीत राहायचं.''

यावर संपत मनमोकळं हसत म्हणाला, ''गंपा, आज चक्क सूर्य पश्चिमेकडून उगवला की काय? तू आणि कामाचा लोड नाही घ्यायचा, हे मी काय ऐकतोय? हे खरंच तूच बोलतोयस ना? आज काही झपाटलं बिपाटलं की काय तुला?''

यावर गणपत म्हणाला, ''तसं काही नाही रे संपा. आपण कितीही आदळ आपट केली, कितीही कष्ट केले, कितीही नियोजन करून काहीतरी केले तरी आपल्याला त्यात यश येईल किंवा त्यातून बऱ्यापैकी पैसा मिळेल, याबद्दल आता गॅरंटीच राहिली नाही! कोणताही व्यवसाय करा की पीक घ्या, त्यात काहीतरी संकट पुढे येतंच! साखरेला मागणी वाढली, इथेनॉलचे रेट वाढले म्हणून वाटलं होतं ऊसाचे भाव वाढतील पण कसलं काय? साखर निर्यात बंद आणि इथेनॉलचे पैसे शेतकऱ्यांना कधी पोहोचतील आणि कसा हिशेब होईल याबद्दल बहुतेक ब्रह्मदेवच सांगू शकेल! ऊसाचे दर आहे तेथेच, उत्पादन खर्च मात्र दुप्पट झाला. कापसाला चांगले दिवस येतील असे दिसत असताना कुठे माशी शिंकली कळाले नाही पण अजूनही कापूस गटांगळ्याच खातोय. हरभरा, सोयाबीनचे हाल पाहवत नाहीत. तूर भाव खातेय पण ती आता शेतकऱ्यांच्या हातात राहिली नाही. गव्हाने थोडी वर मान काढली होती परंतु नंतर तो आहे तेथेच शांत झाला. कांदा तर मागच्या वर्षापासून डोळ्यात पाणी आणत आहे. त्याला कधी भाव देतील माहीत नाही. भाजीपाल्याची वाट लागली. आरं संपा, मला तर कोणतं पीक करावं तेच कळत नाही. खरीप पिकांचे हमीभाव जाहीर तर करतात, पण भाव कधी जाहीर केले पाहिजेत, हे झोपलेल्या सरकारला माहीत नाही! अर्थात शेतीमालाला हमीभाव जाहीर करूनही त्याचा किती उपयोग होतो हे आपल्याला माहीतच आहे. पिकावर जास्त विसंबून राहू नये म्हणून दूध धंद्याची जोड शेतीला द्यावी असे सगळे सांगतात. आज ७०-८० टक्के अल्पभूधारक शेतकरी या दूध व्यवसायावर अवलंबून आहेत. मात्र दूध व्यवसायालाही उतरती कळा लागली आहे. मागील काही महिन्यांत चांगले भाव वाढले होते दुधाला, पण सरकारने लंपी रोगाच्या प्रादुर्भावामुळे दुग्धजन्य पदार्थ, दुधाची पावडर आयात करायला प्रोत्साहन दिलं. झालं तर मग! थोडाफार पैसा दुधातून मिळायला लागला आणि या बातमीमुळे दर पंधरा दिवसाला २-३ रुपयांनी दुधाचे दर घसरायला लागले. सांगता येत नाही कधी ते परत ३० च्या आत जातील ते! अशा परिस्थितीमध्ये तू सांग संपा, शेतकऱ्यांनी कसे जगायचे? हे सरकार काय फक्त महागाई कमी करण्याचा

एककलमी कार्यक्रम राबवत आहे काय? आणि हो, महागाई कमी करायची तर ती काय फक्त शेतकऱ्यांच्या जीवावर?''

आज संपत सर्व शांतपणे ऐकत होता. कारण त्याला गणपतच्या स्वभावाचा चांगला परिचय होता. त्याला मध्येच थांबवणे म्हणजे विस्तवावर पाणी ओतण्यासारखे होते.

गणपतने मनातील सर्व मळमळ बाहेर काढल्यानंतर संपतने हळूच बोलायला सुरुवात केली. तो म्हणाला, ''हे बघ गंपा, तू म्हणतो तशी परिस्थिती खरीच आहे. यात कोणतीही शंका नाही की आज शेती उत्पादनाच्या भावाबद्दल कोणीही बोलत नाही. भाव वाढले तर ते नियंत्रणात आणण्यासाठी अनेक शासकीय निर्बंध असतात. भाव कोसळले तर मात्र शासनाकडून लवकर कार्यवाही होत नाही. दुधाचाच विषय घे ना. मागील काही वर्षांपासून दुधाचे भाव २० ते ३० रुपयांदरम्यान रेंगाळले आहेत. याच कालखंडामध्ये पेंडीचे दर ७०० रुपयांवरून २००० रुपयांच्या पुढे गेले. खाद्याचे भाव गगनाला भिडले. चारा महागला. मजुरीचे दर वाढलेत. सर्व बाबींचा विचार केला तर दुधाचे दर कमीत कमी रुपयांपर्यंत पाहिजे होते. आता कोठे वाटले होते की दुधाचे दर अपेक्षित पातळीवर जातील. परंतु आता तर दर कमी कमी होत आहेत. दहीहंडीसारखी गंमत झाली बघ या दूध दराची. आता वाटलं होतं की ४० रुपयांना भाव पोहोचून दहीहंडी फुटेल, पण कसलं काय? सर्वच थर कोसळले; दहीहंडी फुटलीच नाही! आता तर काही जण सांगतात की हे भाव परत ३० रुपयांच्या दरम्यान स्थिरावतील. अशा परिस्थितीमध्ये दूध व्यवसाय कसा काय परवडेल हे देवच जाणो.''

मध्येच संपतला थांबवत गणपत म्हणाला, ''कारं संपा, खरंच आपल्याकडे दुधाचे उत्पादन एवढे वाढले आहे का, की ज्यामुळे दुधाचा पुरवठा वाढून दुधाचे दर कोसळतात? दुधाबरोबरच दुग्धजन्य पदार्थांचा वापर वाढत असताना खरं तर दुधाला जास्त मागणी वाढायला पाहिजे. पण इथे तर उलट होताना दिसतंय. दुधाचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसत नाही तरी मग दुधाचे दर का कमी होतात?''

यावर हसून संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, दुधाचा धंदा म्हणजे नासका धंदा, अशी एक म्हण आहे! ती मुख्यत: दूध उत्पादन ते दुधाचा वापर या संदर्भातल्या अनेकदा चुकणाऱ्या गणिताचा विचार करून तयार झालेली आहे. आज दूध उत्पादकांच्या पातळीवरून आकडे गोळा केले आणि प्रत्यक्षात दुधाचा जो वापर आहे त्याच्यासोबत या आकडेवारीची तुलना केली, तर ४० ते ५० टक्के दूध हे इतर ठिकाणांहून– म्हणजे शेतकऱ्यांच्या व्यतिरिक्त अन्य स्त्रोतांतून आलेले असते. म्हणजे आज जेवढ्या दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीसाठी दूध लागते त्याच्या फक्त ५०–६० टक्केच दूध शेतकरी तयार करतात. बाकीचे दूध हे इतर अनेक पायऱ्यांवर तयार होत असते. त्यामुळे दूध उत्पादकांपेक्षा दूध वितरण व्यवस्थेतील समाजघटक झटपट मोठे होतात. शेतकऱ्यांना दूध व्यवसाय अशाश्वत, तोट्याचा वाटतो तर उत्पादक ते ग्राहकांमधील मध्यस्थांना तो सर्वात शाश्वत आणि जास्त फायद्याचा वाटतो. खरं तर निसर्गाने गायी– म्हशींच्या माध्यमातून स्वच्छ दूधनिर्मितीची व्यवस्था केली आहे. दुधाला 'पूर्णान्न' म्हटलं जातं. दुधातील पोषक घटकांचा विचार केला तर एक समृद्ध, सुसंस्कृत, निरोगी आणि बुद्धिमान पिढी घडविण्यामध्ये दुधाचा मोलाचा वाटा आहे. परंतु आजच्या या कलियुगात समाजाच्या हितशत्रूंनी भेसळीच्या माध्यमातून दुधाला बदनाम केले आहे. दुधात भेसळ होते म्हणून काही लोक दुधाचे सेवन टाळतात. दुग्धजन्य पदार्थांचे सेवनही करत नाहीत. याचा सर्वात वाईट परिणाम हा त्यांच्या आरोग्यावर होतोच होतो, त्याचबरोबर दूध उत्पादक शेतकऱ्यांनाही त्याचा फटका बसतो.''

गणपत मध्येच म्हणाला, ''म्हणजे करतो एक आणि भरतो दुसराच. संपा, मला तर एवढा संताप येतो या दुधात भेसळ करणाऱ्यांचा, वाटतं भर चौकात त्यांना फाशीची शिक्षा द्यावी. पण आपण देऊ शकत नाही शिक्षा. कारं संपा, यासाठी सरकारचं काही धोरण, कायदे आणि व्यवस्था असतीलच ना; आपल्या अन्नात कोणीही विष कालवू नये यासाठी?''

यावर संपत हसून म्हणाला, ''आहेत रे बाबा सगळे कायदे– व्यवस्था आणि यंत्रणा. पण त्यांनीही प्रामाणिकपणे कामे केली पाहिजेत ना! अरे गंपा, या दूध भेसळीत एवढा पैसा आहे की सर्वच यंत्रणांचे तोंड बंद

करता येते. आपल्या शेजारच्या चीनमध्ये दुधात भेसळ केली तर त्याला आजन्म कारावास किंवा फाशीची शिक्षा दिली जाते. एक वेळ खून केलेल्याला सोडले जाऊ शकेल; परंतु दूध भेसळीवाल्यांना नाही सोडत. काही प्रसंगी खून हा अचानक, रागाच्या भरात होऊ शकतो– परंतु भेसळ हा एक 'नियोजित गुन्हा' आहे आणि त्यातून केवळ एक जणच नाही तर अनेकांचे आयुष्य बरबाद होते. अनेक प्रगत देशांमध्ये दुधाची तपासणी, त्याची प्रत चांगली ठेवणे यावर अनेक निर्बंध आणि कायदे आहेत. मात्र आपण आजही दुधाच्या गुणवत्तेबद्दल फारच वरवरचा विचार करतो. गंपा, तुला एक सांगतो, आपल्या देशातील सर्व यंत्रणांनी जर ठरविले की यापुढे मी दुधात भेसळ करणार नाही आणि कोणालाही करू देणार नाही, तर दुधाचा आज तो पुरवठा आहे त्यापैकी ३० ते ४० टक्के कमी होईल. त्यामुळे आपोआपच दुधाला चांगला भाव मिळेल. ग्राहकांना चांगले दूध मिळाले तर तेही त्याचा वापर वाढवतील. अर्थात यासाठी सर्व यंत्रणांनी चांगल्या भावनेने यामध्ये काम करण्याची गरज आहे.''

यावर हसून गणपत म्हणाला, ''आपल्या देशात होईल का हे सर्व? कारण आपल्या देशात जो कायदा मोडतो तोच खरा मर्द, मोठा माणूस! राजकारणामध्येही यांचा मोठा दरारा असतो. सरकारमध्येही त्यांचे चांगले चालते. मग हे सर्व कसं काय नियंत्रणात येईल आणि दुधाला चांगले दिवस येतील याबद्दल शंकाच आहे. नुसतं स्वप्न पाहत बसण्यासारखं आहे हे सर्व!''

यावर हसत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, कोणत्याही गोष्टीला काही काळवेळ असते. नंतर मात्र ती गोष्ट आपोआप नामशेष होते. दूध उत्पादक बदलत आहे. त्यांना या बाबीची माहिती होत आहे. ग्राहकही बदलत आहे. कोणते चांगले, कोणते वाईट याचीही जाणीव त्याला होत आहे. जास्त पैसे मोजून ग्राहक चांगल्या प्रतीचा शेतीमाल घ्यायला तयार होत आहे. कारण त्यांना याची जाणीव होत आहे की, निरोगी आयुष्यासाठी चांगल्या प्रतीचे अन्न खाणे हाच पर्याय आहे. हा बदल होत असताना मधल्या स्तरावर कार्य करणाऱ्या योजनांनाही त्यानुसार बदल करावा लागतो. म्हणून तुला सांगतो गंपा, काही काळ थांब. या सर्वांना काळच नियंत्रणात आणेल. कारण काही गोष्टी अशा असतात की ज्यांना आपण जर नियंत्रणात आणू शकलो नाही तर त्यांना काळच चांगल्या प्रकारे नियंत्रणात आणतो.''

यावर हसून गणपत म्हणाला, ''ठीक आहे संपा, बघू आता काळ कधी एकदाचा हा विषय संपवतो आणि आपल्या दूध धंद्याला चांगले दिवस दाखवतो. चल, तुला मी चांगल्या दुधाचा स्पेशल चहा पाजतो.''

यावर दोघेही हसले आणि हॉटेलकडे चालू लागले.

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता **मोबाईल नंबर**सह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला **पासपोर्ट आकाराचा फोटो**ही जरूर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम–११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक– ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**– संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**